सत्यमेव जयते

# प्रशांत बन्सीलाल बंब

सदस्य, महाराष्ट्र विधानसभा

जा.क्र./कार्या/विका/छ.सं./१९९९७
दि.२९/११/२०२३

प्रति,

**मा.ना.श्री.एकनाथजी शिंदे साहेब,**
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.

**मा.ना.श्री.देवेंद्रजी फडणवीस साहेब,**
उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.

**मा.ना.श्री.अजितदादा पवार साहेब,**
उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.

**मा.ना.श्री.दिपकजी केसरकर साहेब,**
शालेय शिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य.

**विषय:-** **'शिक्षक' मुख्यालयी न राहाता घटनात्मक कर्तव्याचे कार्यपालन करत नसल्यामुळे तसेच शिक्षणाचा दर्जा प्रचंड खालावलेने राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्यात देण्यात आलेली ४% वाढ ही शिक्षकांना देण्यात येऊ नये याबाबत.**

**संदर्भ:-**

**१.** गटविकास अधिकारी, पंचायत समिती, खुलताबाद यांना लिहिलेले पत्र जा.क्र./कार्या/विका/२६९८ दि.०६/०५/२०२०.

**२.** गटविकास अधिकारी खुलताबाद यांचे पत्र जा.क्र./पंसखु/पंर/कावि/२०२० दि.०७/०५/२०२०.

**३.** गटविकास अधिकारी, पंचायत समिती, खुलताबाद यांना लिहिलेले पत्र जा.क्र./कार्या/विका/६०५७ दि.०१/०५/२०२१.

**४.** गटशिक्षाणाधिकारी, पंचायत समिती गंगापुर यांचे पत्र जा.क्र.पसगं/शिक्षण/आस्था-१/कावि-२०२१ दि.१४/०६/२०२१.

**५.** गटविकास अधिकारी, पंचायत समिती, गंगापूर यांना लिहिलेले पत्र जा.क्र./कार्या/विका/६०५६ दि.०१/०५/२०२१.

**६.** गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती, गंगापूर यांना लिहिलेले पत्र जा.क्र./कार्या/विका/७०२५ दि.१३/०६/२०२१.

**७.** माझ्या मतदारसंघातील मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यासमवेत आयोजित केलेली पत्रकार परिषद दि.०७/०९/२०२१.

**८.** दि.०४/१०/२०२१ रोजी गंगापुर येथे आयोजित आमसभा.

**९.** दि.११/१०/२०२१ रोजी खुलताबाद येथे आयोजित आमसभा.

**१०.** मा.तत्कालीन मुख्यमंत्री आणि शिक्षणमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांना दिलेले पत्र जा.क्र./कार्या/विका/औबाद/८१८१ दि.२८/१०/२०२१.

**११.** मा.गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती खुलताबाद यांना दिलेले पत्र जा.क्र./कार्या/विका/औबाद/८६५२ दि.१३/०५/२०२२.

**१२.** मा.गटविकास अधिकारी, तहसिलदार, तालुका आरोग्य अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, खुलताबाद यांना दिलेले पत्र जा.क्र./कार्या/विका/औबाद/९००९ दि.१३/०८/२०२२.


**बदललेला पत्र व्यवहाराचा पत्ता : औरंगाबाद**
दुसरा मजला, राजा बन्सीलाल मार्केट,
सीटीएस क्र.19381/8/1, बन्सीलाल नगर,
रेल्वे स्टेशन रोड, औरंगाबाद-431005.

**लासुर कार्यालय पत्ता**
मु.पो. लासुर स्टेशन,
ता. गंगापुर, जि. औरंगाबाद
महाराष्ट्र - 423702.

**मुंबई कार्यालयाचा पत्ता (संपर्क)**
खोली क्र. 220, आकाशवाणी, आमदार निवास,
मुंबई - 400032, दुरध्वनी (022) 22886164,
फॅक्स (022) 22886017.

E-mail ID : prashantbumb111@gmail.com

सत्यमेव जयते

# प्रशांत बन्सीलाल बंब

सदस्य, महाराष्ट्र विधानसभा

१३. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद, छ.संभाजीनगर यांना दिलेले माझे पत्र जा.क्र./कार्या/विका/औबाद/१००२६ दि.०८/०९/२०२२.
१४. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद, छ.संभाजीनगर यांना दिलेले माझे स्मरणपत्र जा.क्र./कार्या/विका/औबाद/११०७७ दि.२२/१०/२०२२.
१५. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद, छ.संभाजीनगर यांना दिलेले माझे स्मरणपत्र जा.क्र./कार्या/विका/औबाद/१३०५१ दि.१५/१२/२०२२.
१६. **मा.मुख्य सचिव,** महाराष्ट्र राज्य, यांना दिलेले माझे पत्र जा.क्र./कार्या/विका/औबाद/१००७८ दि.२२/०९/२०२२.
१७. **मा.मुख्य सचिव,** महाराष्ट्र राज्य, यांना दिलेले माझे स्मरणपत्र जा.क्र./कार्या/विका/औबाद/१५०५४ दि.१४/०२/२०२३.
१८. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद, छ.संभाजीनगर यांना दिलेले माझे स्मरणपत्र जा.क्र./कार्या/विका/औबाद/१५०८१ दि.१७/०२/२०२३.
१९. **मा.प्रधान सचिव,** शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, यांना दिलेले माझे पत्र जा.क्र./कार्या/विका/छ.सं./१९२११ दि.१८/०६/२०२३.
२०. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद, छ.संभाजीनगर यांना दिलेले माझे स्मरणपत्र जा.क्र./कार्या/विका/औबाद/१९४६० दि.१२/०८/२०२३.
२१. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद, छ.संभाजीनगर यांना दिलेले माझे स्मरणपत्र जा.क्र./कार्या/विका/छ.सं./१९६०९ दि.०४/०९/२०२३
२२. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद, छ.संभाजीनगर यांना दिलेले माझे स्मरणपत्र जा.क्र./कार्या/विका/छ.सं./१९७४२ दि.२९/०९/२०२३.
२३. शासन पुरकपत्रक क्रमांक-अराप-२००८/प्र.क्र.२३२/आस्था-९ ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ दि.०३/११/२००८
२४. शासन निर्णय क्रमांक:घभाभ-१०१५/प्र.क्र.१/सेवा-५ खो.क्र.३३५, (विस्तार), वित्त विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई-३२ दि.०७ ऑक्टोबर २०१६.
२५. शासन परिपत्रक क्रमांक.परास २०१८/प्र.क्र.४८८/आस्था-७ ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ दि.०९ सप्टेंबर २०१९.
२६. शासन परिपत्रक क्रमांक:शाआशा-२०१५/प्र.क्र.२७८/का.१३ आदिवासी विकास विभाग, मंत्रालय विस्तार, मुंबई-३२ दि.२४ ऑगस्ट २०२१.
**२७. दैनिक लोकमत वृत्त पत्रातील दि.२४/११/२०२३ रोजीची जाहिराती बाबत.**

**महोदय,**

राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या महामागाई भत्त्यात ४% वाढ केलेली जाहिरात आजच्या दैनिक लोकमत मध्ये प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्याबाबत गांभिर्यपुर्वक कळविण्यात येते की, मी वर्षानुवर्षे सतत शिक्षक मुख्यालयी राहणे याविषयी काम करत आहे. राज्यातील शिक्षणाचा दर्जा इतका खालावलेला असतांना, तसेच शिक्षणासाठी गोर-गरीब विद्यार्थ्यांची हालअपेष्टा करुन, राज्यातील पिढ्या बर्बाद होत आहेत.

बदललेला पत्र व्यवहाराचा पत्ता : औरंगाबाद
दुसरा मजला, राजा बन्सीलाल मार्केट,
सीटीएस क्र.19381/8/1, बन्सीलाल नगर,
रेल्वे स्टेशन रोड, औरंगाबाद-431005.

लासुर कार्यालय पत्ता
मु.पो. लासुर स्टेशन,
ता. गंगापुर, जि. औरंगाबाद
महाराष्ट्र - 423702.

मुंबई कार्यालयाचा पत्ता (संपर्क)
खोली क्र. 220, आकाशवाणी, आमदार निवास,
मुंबई - 400032, दुरध्वनी (022) 22886164,
फॅक्स (022) 22886017.

E-mail ID : prashantbumb111@gmail.com

सत्यमेव जयते

# प्रशांत बन्सीलाल बंब

सदस्य, महाराष्ट्र विधानसभा

एकीकडे राज्यातील नवयुवकांना नोकऱ्या मिळत नाहीत. यांचेपेक्षा जास्त मेहनत करतील असे नवयुवक राज्यात काम करण्यासाठी तयार असतांना, या शिक्षकांना इतका भरमसाठ पगार असुन, वारंवार त्यात वाढ करत असल्यामुळेच; या नवयुवकांना नोकऱ्यांमध्ये सामावून घेता येत नाही.

शिक्षकांच्या गैरवर्तवणुक, भ्रष्टाचार, गैरव्यवहार, इत्यादी प्रकारांमुळे विद्यार्थ्यांना आवश्यक ते शिक्षण मिळत नाही, ६ वी ७ वी च्या मुलांना साधे लिहिता वाचता येत नाही, अशी दयनीय अवस्था आहे. यासाठी ८०% जबाबदार संबंधित शिक्षकच आहेत. कारण मुख्यालयाचे ठिकाणी राहत नसल्याने, व त्यांचे शिक्षकी पेशाशी इमानदारीने शिक्षण देत नसल्यामुळेच जिल्हा परीषद शाळांची अशी दुर्देवी अवस्था पाहायला मिळत आहे. त्यामुळे गावां-गावांतील नागरिकांमध्येही प्रचंड रोष शिक्षकांप्रती पर्यायाने प्रशासनावर निर्माण होत आहे.

**जर आपण या शिक्षक कर्मचाऱ्यांना महागाई भत्त्यात वाढ करणारच असाल तर, कृपया मला मी जे बोलता ते चुकीचे आहे असे, आपल्या विभागाकडून लेखी द्यावे.**

संदर्भीय पत्रान्वये वेळोवेळी कळकळीने भावना व्यक्त केलेली आहे, व करत आहे की, प्रत्येक शिक्षक हे मुख्यालयी राहणे घटनात्मक बंधनकारक आहे, परंतु संबंधीत "शिक्षक" हे आपल्या कर्तव्यांशी दगा करुन, अजूनही शहराच्या व इतर ठिकाणांवरुन अप-डाऊन (ये-जा) करतच आहेत.

मी, गेल्या दोन वर्षांपासुन वारंवार घटनात्मक मागणी करुनही संबंधित शिक्षकांवर प्रत्यक्षात कडक अंमलबजावणी करण्याचे संबंधित मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, हे मुद्दामहून टाळत आहे. गोर-गरीब जनतेच्या पाल्यांशी निगडीत असलेला व नवीन पिढ्यांच्या भविष्यांचा इतका गंभीर विषय असुनही, संबंधित शिक्षक व त्यांचे बेकायदेशीर संघटनांना वरीष्ठ अधिकारी बळी पडत आहेत.

माझ्या मतदारसंघातील तत्कालीन मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री.गटणे साहेब, यांना लक्षात आणुन देताच, त्यांनी मुख्यालयी न राहणाऱ्या शिक्षकांचा घरभाडे भत्ता (HRA) बंद केलेला आहे, तरीदेखील संबंधित शिक्षक हे वरीष्ठांच्या आदेशाचा अवमान करुन, मुजोरीने अपडाऊनच करत आहे, ही दुर्भाग्यपुर्ण बाब नमूद करावी लागत आहे.

घरभाडे बंद होणे याचा अर्थ मुख्यालयी न राहाता अपडाऊन (ये-जा) करण्याची कायदेशीर परवानगी मिळत नाही. शिक्षकांना मुख्यालयी राहावेच लागेल, व शिक्षणात प्रचंड सुधारणा करावी लागेल, कारण की हा राज्याच्या पिढ्या बर्बाद होत असलेचा विषय आहे.

शिक्षक हे त्यांचे जबाबदारी पार न पाडता मुजोरीने गावां-गावांत राजकारण करुन लोकांना दाबण्याचा प्रयत्न करत आहेत. तसेच स्वत:ची जबाबदारी इमानदारीने पार पाडण्याऐवजी भलतेच गैरप्रकार करण्यामध्ये व्यस्त आहेत. ज्यामुळे शिक्षणाचा दर्जा प्रचंड खालावलेला आहे.

बदललेला पत्र व्यवहाराचा पत्ता : औरंगाबाद
दुसरा मजला, राजा बन्सीलाल मार्केट,
सीटीएस क्र.19381/8/1, बन्सीलाल नगर,
रेल्वे स्टेशन रोड, औरंगाबाद-431005.

लासुर कार्यालय पत्ता
मु.पो. लासुर स्टेशन,
ता. गंगापुर, जि. औरंगाबाद
महाराष्ट्र - 423702.

मुंबई कार्यालयाचा पत्ता (संपर्क)
खोली क्र. 220, आकाशवाणी, आमदार निवास,
मुंबई - 400032, दुरध्वनी (022) 22886164,
फॅक्स (022) 22886017.

E-mail ID : prashantbumb111@gmail.com

सत्यमेव जयते

# प्रशांत बन्सीलाल बंब

सदस्य, महाराष्ट्र विधानसभा

शासनातील वरीष्ठ अधिकाऱ्यांचा कुठलाही वचक जिल्हा, तालुका व ग्रामपातळीवरील शिक्षण विभागातील शिक्षक व शिक्षकेत्तर अधिकारी/कर्मचारी यांचेवर राहिलेला नाही. त्यामुळे शिक्षकी पेशा असणाऱ्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची एवढी मुजोरी वाढली आहे की त्यांचे गैरधंदे, वशिलेबाजी, संस्थाचालकांबरोबर संगणमत करुन गैरव्यवहार व भ्रष्टाचार करणे, स्वत:चे नातेवाईकांना शैक्षणिक क्षेत्रात नोकरी लावणे, जुगार खेळणे, पान, तंबाखू, गुटखा खाऊन मुलांना शिकवणे, इत्यादी गैरप्रकार सुरु आहेत.

मुख्यालयी राहणे हा घटनात्मकदृष्ट्या सर्वात प्रखर व महत्वाचा मुद्दा आहे. शिक्षकांनी शाळेव्यतिरिक्त गावांत राहणे, यामागे गावांचे संस्कार दडलेले आहेत. तसेच घटनेस शिक्षक मुख्यालयी राहणे ही बाब प्रचंड अपेक्षित आहे, जेणेकरुन गाव, तालुका, जिल्हा, राज्य व देश घडविण्याची जबाबदारी शिक्षकांवर आहे. तरीही शिक्षक सर्रासपणे मुख्यालयी न राहत अपडाऊन करतात. याचा अर्थ ते शिक्षकी पेशाशी बेईमानी करत आहेत.

**ही सर्व कामे तपासणेस व त्यांचेकडून सर्व सेवा जनतेपर्यंत पोहोचविणे हे मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद यांचे कर्तव्य असुनही, ते पार पाडत नसल्यामुळे; आता त्यांचेवर आपल्यामार्फत कार्यवाही प्रस्तावित करण्याशिवाय दुसरा पर्याय नाही.**

करीता जोपर्यंत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मुख्यालयी राहायला जात नाही, तोपर्यंत राज्यातील कोणत्याही शिक्षकांना महागाई भत्त्यात कोणतीही वाढ देण्यात येऊ नये. उलट राज्यातील जो घरभाडे भत्ता शिक्षकांना दिला जातो तोही बंद करुन, आतापर्यंत त्यापोटी घेतलेल्या रक्कमेची वसूली त्यांचेकडून करण्यात यावी.

शासनाची फसवणुक तसेच, आतापर्यंत केलेली अरबो रुपयांची लूट, तसेच मुख्यालयी राहत असल्याचे खोटे पुरावे शासनास सादर करणे, गैरव्यवहार व भ्रष्टाचार करणे, या व इतर गैरकृत्ये केल्यामुळे; संबंधित शिक्षकांच्या महागाई भत्त्यामध्ये एक रुपयांचीही वाढ करण्यात येवु नये.

**कृपया आपण याबाबत गंभीर नोंद घ्यावी. मी, संदर्भिय पत्रान्वये आतापर्यंत केलेल्या तक्रारींमध्ये कोणतेही तथ्य नसल्याचे, मला आपल्या संबंधित विभागांकडून लेखी आश्वासीत करावे, हि विनंती.**

**प्रत:-माहिती व वरीलप्रमाणे कार्यवाहीस्तव.**

१. **मा.मुख्य सचिव,** महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२.
२. **मा.प्रधान सचिव,** शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२.
३. **मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद सर्व महाराष्ट्र राज्य.**

**आपला,**

**(प्रशांत बन्सीलाल बंब)**

बदललेला पत्र व्यवहाराचा पत्ता : औरंगाबाद
दुसरा मजला, राजा बन्सीलाल मार्केट,
सीटीएस क्र.19381/8/1, बन्सीलाल नगर,
रेल्वे स्टेशन रोड, औरंगाबाद-431005.

लासुर कार्यालय पत्ता
मु.पो. लासुर स्टेशन,
ता. गंगापुर, जि. औरंगाबाद
महाराष्ट्र - 423702.

मुंबई कार्यालयाचा पत्ता (संपर्क)
खोली क्र. 220, आकाशवाणी, आमदार निवास,
मुंबई - 400032, दुरध्वनी (022) 22886164,
फॅक्स (022) 22886017.

E-mail ID : prashantbumb111@gmail.com